# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहा. आयुक्त 'ई' विभाग यांचे कार्यालय , शेख हाफिजूद्दीन मार्ग, भायकळा (प), मुंबई -८.

**सहा. अभि./ई/२२२०/घकव्य. दि. ०६.०५.२०२४**

**विषय -** ''ई' विभागात पावसाळापूर्वी प.ज.वा. संबंधी कामाकरिता अशासकिय संस्थांच्या (N.G.O) स्वयंसेवकांची नेमणूक करणे बाबत, सन– २०२४' करिता सूचना

सदर सुचनेद्वारे नोंदणीक्रुत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, ''ई' विभागात पावसाळापूर्वी प.ज.वा. संबंधी कामाकरिता अशासकिय संस्थांच्या (N.G.O) स्वयंसेवकांची नेमणूक करणे बाबत, सन–२०२४' कामाकरीता खालील अटीनुसार कामगार पुरविण्याबाबत इच्छुक अशासकीय संस्थांनी 'सहाय्यक आयुक्त 'ई' विभाग, कार्यालय इमारत, शेख हाफिजूद्दीन मार्ग, भायकळा (प), मुंबई -८' हयांचे नावे नोंदणी प्रमाणपत्रे व अनुभव इत्यादी आवश्यक कागदपत्रांसहित दिनांक १०.०५.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत इच्छापत्र मोहरबंद लिफाफा सहा.अभि.(घ.क.व्य.) 'ई' विभाग कार्यालय, येथे सिलबंद पेटीत टाकावे.

अशासकीय संस्थानी अर्जासोबत खालील **कागदपत्रांची / नियमांची** पूर्तता करणे आवश्यक आहे :

१. सदर कामासाठी 'ई' विभागातील पर्जन्य जलवाहीनी कामाचा अनुभव संस्थाना असावा.'ई' विभागातील अधिका-यांच्या सुचनेनुसार रोजच्या कामाकरीता मागणी केलेल्या (दिवस / दुपार / रात्र) सुरळीतपणे, विनाविलंब, सक्षम कामगारांचा पुरवठा करणे.

२. सदर कामासाठीचे अर्ज सहा.अभि.(घ.क.व्य.)'ई'विभाग कार्यालयातून रु.३००/- (+१८% GST) रकमेचा भरणा करून प्राप्त करता येईल.

३. सर्व पात्र संस्थांमधून सोडत पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या संस्थानी अनामत रक्कम म्हणून रु. ५,०००/- बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे डी डी / रोख स्वरुपात जमा करावेत. सदर रक्कम काम यशस्वीरित्या पुर्ण झाल्यानंतर परतावा करण्यात येईल.

४. अशासकीय सस्थांनी मागील तीन वर्षामधील आर्थिक वर्षापैकी एका वर्षाचा ताळेबंद अहवाल संस्थेच्या अर्जासोबत जोडावा.

५. दिलेल्या पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार अर्जाची छाणनी केली जाईल. सर्व पात्र संस्थांमधून सोडत पध्दतीने संस्थांची नेमणूक करण्यात येईल. या विभाग कार्यालयाने पात्र संस्थांस कोणत्या स्वरुपाचे काम दयावयाचे याबाबतचे सर्व अधिकार राखून ठेवले आहेत. तसेच पात्र संस्थांस ज्या स्वरुपाचे काम देण्यात येईल त्या स्वरुपाचे काम करणे त्यांना बंधन कारक राहील.

६. अशासकीय संस्थानी कामाच्या पुर्ततेसंबंधी शपथपत्रे 100 रु. स्टँम्पपेपर वर दयावेत आणि संस्थानी महानगरपालिकेकडे नोंदणी केलेले वेंडर नंबर आणि बँक खात्याचा तपशिल अर्जासोबत सादर करावीत.

७. अ) संस्थांनी त्यांच्या सर्व सभासदांना काम सुरू करताना ओळखपत्र, हजेरी कार्ड देणे बंधनकारक राहिल.
ब) संस्थांनी विभाग नुसार स्ववंसेवक वर देखरेख करिता एक supervisor नेमणे बंधनकारक राहिल.
क)प्रत्येक संस्थेने दैनंदिन कामाचे PHOTOS काढुन संबंधित विभागाकडे नियमित सादर करणे बंधनकारक राहिल.

८. पावसाळ्या दरम्यान 'ई, विभागात कुठेही पाणी साचू नये तसेच कोणतेही पूरसदृष्य स्थिती उद्भवू नये याकरीता सदर काम अतिमहत्वाचे व वेळेत पुर्ण होण्याची दक्षता सदर संस्थेने घेण्यात यावी.

९. वरील अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरित्या काम न करणा-या अशासकीय संस्थेचे काम त्वरित थाबंविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त 'ई' विभाग हयांचेकडे राहतील.

सही/-

**सहा.अभि.(घ.क.व्य.)'ई'विभाग**